महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257-2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 2 मे, 2020 व दिनांक 03 मे, 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्रमांक क्र दंडप्र-01/कावि/2020/186 दिनांक 03 मे, 2020
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 17 मे, 2020
7. या कार्यालयाचे आदेश क्रमांक क्र दंडप्र-01/कावि/2020/222 दिनांक 17 मे, 2020
8. या कार्यालयाचे आदेश क्रमांक क्र दंडप्र-01/कावि/2020/221 दिनांक 17 मे, 2020
9. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 19 मे, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/235 दिनांक 21 मे, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून दिनांक 31 मे, 2020 पावेतो मुदत असलेले आदेश या कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच उपोद्घातात नमूद या कार्यालयाकडील आदेश दिनांक 17 मे, 2020 अन्वये **फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 अन्वये दिनांक 31 मे, 2020 पावेतो** मुदत असलेले आदेश लागू करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 19 मे, 2020 अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्राचा समावेश हा **रेड झोन (Red Zone )** मध्ये करण्यात आलेला असून जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील क्षेत्र वगळता इतर क्षेत्राचा समावेश हा **Non Red Zone** मध्ये करण्यात आलेला असून सदरील **रेड झोन (Red Zone ) व Non Red Zone** (Orange & Green Zone) **मध्ये Essential व Non-Essential** आस्थापना / घटक / दुकाने दिनांक 22 मे, 2020 पासून सुरु करण्याबाबत नमूद आहे.

त्याअर्थी, मी, **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन व उपोद्घातात नमूद शासनाकडील आदेश दिनांक 19 मे, 2020 मध्ये नमूद तरतुदींच्या अधिन राहून या कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमीत करण्यात येत असून **दिनांक 22 मे, 2020 पासून दिनांक 31 मे, 2020 या कालावधीकरीता** खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

1) **जळगांव शहर महानगरपालिका जळगांव** हद्दीतील क्षेत्र हे **रेड झोन (Red Zone)** म्हणून घोषित करण्यात आलेले असून सदर क्षेत्रात उक्त शासन आदेशातील **परिच्छेद क्रमांक 06 ( Annexure-II) मध्ये नमूद बाबी तसेच परिच्छेद क्रमांक 11 व 13** मध्ये नमूद केलेल्या बाबी दिलेल्या निर्देशानुसार लागू राहतील.

Scanned with CamScanner

2) जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे कार्यक्षेत्र वगळता **जळगांव जिल्हयातील** इतर क्षेत्राचा समावेश हा **Non Red Zone** (Orange & Green Zone) मध्ये करण्यात आलेला असल्याने सदर क्षेत्रात उक्त शासन आदेशातील **परिच्छेद क्रमांक** 06 (Annexure-II) मध्ये नमूद बाबी तसेच **परिच्छेद क्रमांक** 13 व 14 मध्ये नमूद केलेल्या बाबी दिलेल्या निर्देशानुसार लागू राहतील.

3) **जळगांव जिल्हयातील** ज्या क्षेत्रात Containment Zone म्हणून घोषित करण्यात आलेले आहे व वेळोवेळी भविष्यात Containment Zone म्हणून घोषित करण्यात येणा-या क्षेत्रात उक्त शासन आदेशातील **परिच्छेद क्रमांक** 10 मध्ये नमूद केलेल्या बाबी दिलेल्या निर्देशानुसार लागू राहतील.

4) उक्त शासन आदेशातील **परिच्छेद क्रमांक** 4 मध्ये नमूद केलेल्या सर्व प्रतिबंधीत (Prohibited) बाबी जळगांव जिल्हयासाठी **लागू राहतील.**

5) लॉकडाऊन कालावधीत अडकलेले स्थलांतरीत कामगार, यात्रेकरु, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांना इच्छित स्थळी जाण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानगीकामी उक्त शासन आदेशातील **परिच्छेद क्रमांक** 5 ( Annexure-I ) मध्ये नमूद केलेल्या बाबी दिलेल्या निर्देशानुसार लागू राहतील.

6) **फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 अन्वये दिनांक 31 मे, 2020 पावेतो** मुदत असलेले या कार्यालयाकडील आदेश दिनांक 17 मे, 2020 कायम ठेवण्यात येत आहे.

सदरचा आदेश उपोद्घातात नमूद संदर्भ क्र. 9 महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 19 मे, 2020 सोबत वाचावेत.

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक 21/05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

अविनाश ढाकणे

**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**सहपत्र : महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 19 मे, 2020**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जळगांव
5. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
6. उपविभागीय दंडाधिकारी सर्व / कार्यकारी दंडाधिकारी सर्व
7. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
8. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
9. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
10. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
11. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
12. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
13. सहायक कामगार आयुक्त,जळगांव
14. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जळगांव
15. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
16. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,जळगांव
17. उप अभियंता, एम.आय.डी.सी.जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner